# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **16/05/2022**

**Brief of the work done :-**

दुचाकी वाहनांची चोरी करणाऱ्या आरोपीस पोलीस स्टेशन मानोरा येथील पथकाने शिताफीने ताब्यात घेत त्याच्याकडून चोरीच्या 02 दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

क्राइम-न्यायालयातून

## दोन दुचाकीसह एका आरोपीस जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**माझोड** ■ मानोरा ह मानोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत दुचाकी चोरट्याने धुमाकूळ घातल्याने अनेकांच्या दुचाकी चोरीला गेल्या आहेत. यावर मानोरा पोलिसांनी धडक कारवाई करत त्या चोरट्यांवर प्रतिबंधक अंकुश लावण्याचा सपाटा लावला असता दोन दुचाकीसह एका आरोपीस जेरबंद केल्याची कारवाई दि.१५ रोजी केली. पोलीस सूत्रांच्या माहिती नुसार फिर्यादी गजानन लक्ष्मण कांबळे यांची हीरोहोंडा कंपनीची मोटरसायकल महादेव बसवेश्वर संस्थान मस्णी येथे लग्न समारंभ असल्यामुळे उभी करून लग्न समारंभात गेलो. परत आल्यास माझी दुचाकी मिळुन आली नाही. तिचा शोधाशोध घेऊनही मिळुन न आल्याने दि.१३ मे रोजी मानोरा पोलिसांत मोटरसायकल चोरून नेल्याची तक्रार देण्यात आली. याप्रकरणी बीट जमादार



### आरोपीसह दोन मोटर सायकल पोस्टे जमा

संदीप बरडे, बालाजी महल्ले आणी योगेश मनवर यांनी तपास चक्रे फिरवीत आरोपीचा शोधाशोध घेण्यास क्षणाचाही विलंब न करता तालुका दारव्हा जी.यवतमाळ येथील आरोपी पंजाब रामदास ढगे वय ३० राहणार रामगाव रामेश्वर यास दोन दुचाकीसह ताब्यात घेऊन मानोरा पोस्टेला हजर करण्यात आले. या अगोदर बीट जमादार संदीप बरडे यांनी अनेक गुन्ह्यातील आरोपीस जेरबंद करुन गुन्हेगारीला आळा बसविण्याचे कर्तव्य निभाविले. त्याबाबत त्यांचा पोलीस अधिक्षकाच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. सदर आरोपी पंजाब रामदास ढगे याला दोन दुचाकीसह ताब्यात घेऊन त्यांचे विरुध्द कलम ३७९ भांदवि प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. यावेळी पोलीस निरीक्षक सुनील जाधव, पोलीस साहाय्यक निरीक्षक महेश कुचेकर, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार संदीप बरडे, योगेश मनवर, डीबी पथक प्रमुख गणेश जाधव, बालाजी मह्हले, मयुरेश तिवारी, यांनी याकामी अतिशय महत्वाचे कर्तव्य पार पाडले. फोटो (श.प्र.)